गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था

प्रकाशन १

# आर्थिक घडामोडी

( १९३०–५० )

लेखक

ध. रा. गाडगीळ

नी. वि. सोवनी

१९५१

आठ रुपये

प्रकाशक

**गो. वि. सोवनी**, कार्यकारी संचालक,

गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था,

पुणे ४.

मुद्रक

**के. ग. शारंगपाणी**,

आर्यभूषण मुद्रणालय,

९१५/१ शिवाजीनगर,

पुणे ४.

# प्रस्तावना

"पुणें जिल्ह्यांतील फळांची विक्री" व "महाराष्ट्रांतील मोटरवाहतुक" हीं संस्थेचीं दोन्हीं मराठी प्रकाशनें १९३६ सालीं प्रसिद्ध झालीं. त्यानंतर आज १५ वर्षांनीं हें तिसरें प्रकाशन करण्याचा योग येत आहे. संस्थेमार्फत होणाऱ्या आर्थिक व सामाजिक पाहण्यांचे अहवाल जरी प्रथम इंग्रजींत प्रसिद्ध झाले तरी सामान्य जनतेच्या उपयोगासाठीं त्यांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध करावीं असें संस्थेचें प्रथमपासूनच धोरण होतें व आहे. वर उल्लेखिलेलीं पहिलीं दोन प्रकाशनें त्याच उद्देशानें काढण्यांत आलीं होतीं. त्यानंतरच्या काळांत संस्थेच्या कामाचा व्याप व पसारा फार भराभर वाढला, परंतु त्यामानानें मनुष्यबळ मात्र अनेक कारणांमुळें वाढूं शकलें नाहीं. अपुऱ्या मनुष्यबळामुळें संस्थेतर्फे या काळांत केल्या गेलेल्या पाहण्यांचे इंग्रजी अहवालसुद्धां तयार होण्यास विलंब लागू लागला. त्यामुळें साहजिकच त्यांच्या मराठी भाषांतराकडे लक्ष देण्यास सवडच मिळाली नाहीं. तथापि त्याची उपयुक्तता व महत्त्व याची जाणीव आम्हांस सतत असल्यामुळें या काळांत सुद्धां संस्थेबाहेरील मंडळींकडून पैसे देऊन हें काम करवून घेण्याचें आम्ही प्रयत्न केले, परंतु ते समाधानकारक ठरले नाहींत.

पुणें विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून मराठी माध्यमाच्या प्रश्नास पुन्हां एकदां जोराची चालना मिळाली व त्यादृष्टीनें कांहींतरी करण्याची आवश्यकता पुन्हां एकदां जोरानें आमच्या प्रत्ययास आली. तथापि आमची पूर्वीची अडचण कायमच असल्यामुळें कांहीं नवीन लिहून अगर भाषांतर करून प्रसिद्ध करणें आम्हांस अशक्यच होतें. तेव्हां प्रा. गाडगीळ व मीं यांनीं वेळोवेळीं निरनिराळ्या आर्थिक घडामोडींसंबंधीं केलेलें स्फुट लिखाण एकत्र करून प्रसिद्ध करावें अशी जी सूचना यापूर्वीं पुष्कळांनीं केली होती ती स्वीकारावी असें आम्हीं ठरविलें. या दृष्टीनें प्रा. गाडगीळ यांनीं गेल्या २० वर्षांत व मी गेल्या ७–८ वर्षांत लिहिलेल्या लेखांची एक जुळणी तयार करण्यांत आली. ती सर्व कालवार लावल्यावर त्यांत एक अस्पष्ट अशी साखळी दिसूं लागली व एकमेकांशीं अगदींच असंबद्ध असे लेख एकत्र करून आपण आंवळ्यांची मोट वाचकांच्या पदरांत बांधूं अशी वाटणारी भीति निराधार आहे हें लक्षांत आलें. या लेखसंग्रहांत गेल्या २० वर्षांतील कांहीं महत्त्वाच्या आर्थिक घडामोडींचें विवेचन व स्थूलमानानें त्या कालाच्या आर्थिक इतिहासाचे कांहीं महत्त्वाचे भाग ग्रथित होतील अशी खात्री पटली व लगेंच हा संग्रह प्रसिद्ध करण्याचें नक्की करण्यांत येऊन तो आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

या संग्रहांत एकंदर १८ लेख व २ भाषणें यांचा समावेश केलेला आहे. वेळोवेळीं लोकशिक्षण, नवभारत, सह्याद्रि, इत्यादि मासिकांतून व दैनिक ज्ञानप्रकाशांतून तें

प्रसिद्ध झालेले आहेत. संग्रहाचे तीन भाग करण्यांत आले आहेत. १ ल्या भागांत १९३० ते १९३९ पर्यंतच्या कालखंडांत लिहिलेले व त्या काळांतील घटनांशीं संबद्ध असलेले लेख घातले आहेत. ते सर्वच प्रा. गाडगीळ यांचे आहेत. २ ऱ्या भागांत १९३९ ते १९५० पर्यंतच्या काळांतील घडामोडीसंबंधींचे लेख घालण्यांत आले आहेत. त्यांतील कांहीं प्रा. गाडगीळ यांचे व कांहीं माझे आहेत. प्रा. गाडगिळांचीं दोन्हीं भाषणें याच भागांत आलीं आहेत. ३ ऱ्या भागांत कांहीं महत्त्वाच्या संकीर्ण विषयावरील ३ लेखांचा संग्रह केला आहे.

येथें संग्रहित केलेले सर्व लेख लिहिले ते त्या त्या वेळच्या परिस्थितीस अनुलक्षून व त्या त्या वेळीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून पुढच्या काळासंबंधीं अंदाज करून लिहिलेले आहेत. ते आज वाचतांना त्यांतील कांहीं गृहीत कृत्यें व भाकितें अगदींच चुकीचीं वाटतील. तथापि ते लिहिण्याच्या वेळीं त्यावेळच्या माहितीप्रमाणें तींच बरोबर वाटत होतीं हें निर्विवाद आहे. अशाप्रकारच्या चुका होण्याचा धोका सर्व समाजशास्त्रीय व विशेषतः अर्थशास्त्रीय, लिखाणांत सदैव असतो व ज्यास त्या विषयांत लिखाण करावयाचें आहे त्यास तो पत्करणें आवश्यकच असतें.

लेख कोठें प्रसिद्ध होण्यासाठीं लिहिला गेला याचाही लेखावर परिणाम होणें स्वाभाविक असतें. प्रा. गाडगिळांचीं दोन्हीं भाषणें सभेंत वाचण्यासाठीं लिहिलीं गेल्यामुळें त्यांतील भाषाशैली त्यास अनुरूप अशी वापरलेली दिसेल. त्याचप्रमाणें माझे जे लेख ज्ञानप्रकाशांत, बहुधा अग्रलेख म्हणून, प्रसिद्ध झाले त्यांवर थोडी फार वर्तमानपत्री लिखाणाची छाया पडलेली आढळेल. आर्थिक प्रश्नांचें मराठींतून विवेचन करतांना येणाऱ्या कांहीं अडचणींची या लेखसंग्रहावरून पुष्कळशी कल्पना येऊं शकेल.

येथें संग्रहित केलेले लेख जेथें प्रथम प्रसिद्ध झाले त्या मासिकांच्या व वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं ते पुनर्मुद्रित करण्यास आम्हांस परवानगी दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था,
पुणें ४.
ता. ५ मे १९५१

**नी. वि. सोवनी**
कार्यकारी संचालक

# अनुक्रमणिका


| | लेखक | पान |
|---|---|---|
| **प्रस्तावना** | | |
| *भाग १ ( १९३०–३९ )* | | |
| १ सुवर्णमानपद्धति | ध. रा. गाडगीळ | १ |
| २ प्रचलित मंदीची कारणमीमांसा | ” | १८ |
| ३ चांदीच्या भावांतील चढउतार | ” | ३५ |
| ४ सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिति | ” | ४४ |
| ५ हिंदी कंपन्यांची ‘ मॅनेजिंग एजन्सी ’ ऊर्फ व्यवस्थापक–मंडळपद्धति | ” | ५१ |
| ६ आर्थिक व्यवहाराचें नियोजन | ” | ६६ |
| *भाग २ ( १९३९–५० )* | | |
| ७ अर्थसचिवांची कोलांटी उडी | नी. वि. सोवनी | ९६ |
| ८ हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति | ” | १०३ |
| ९ मुंबई प्रांतांतील धान्यपरिस्थिति कशी सुधारेल ! | ध. रा. गाडगीळ | १२१ |
| १० हिंदुस्थानांतील सोन्याची विक्री | नी. वि. सोवनी | १३१ |
| ११ सार्वराष्ट्रीय चलनपरिषद् व तिच्यापुढें मांडलेली योजना | ” | १४० |
| १२ स्टर्लिंग शिलकांचें भवितव्य | ” | १५१ |
| १३ अर्थशास्त्रज्ञांचा दुसरा गंभीर इशारा | ” | १६४ |
| १४ युद्धकालीन नियंत्रणें व युद्धोत्तर योजना | ध. रा. गाडगीळ | १६९ |
| १५ महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें–अध्यक्षीय भाषण | ध. रा. गाडगीळ | १७७ |
| १६ आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य | ” | १९६ |
| १७ साखरेची कटु कहाणी | नी. वि. सोवनी | २२७ |
| *भाग ३ ( संकीर्ण )* | | |
| १८ हिंदी अर्थशास्त्राचा पाया | ध. रा. गाडगीळ | २४३ |
| १९ हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार नाहीं काय ! | नी. वि. सोवनी | २५६ |
| २० कोल्हापूर येथील जननसंख्येसंबंधीं माहिती | नी. वि. सोवनी | २७३ |